लेखांक ४ नीतीचे, नैतिक वर्तनाचे स्वरूप १७ जानेवारी २०१०

# नीतीचे, नैतिक वर्तनाचे स्वरूप

**श्रीनिवास हेमाडे**

चांगले - वाईट, योग्य - अयोग्य , उचित - अनुचित, कर्तव्य - अकर्तव्य , सद्‌गुण - दुर्गुण ही मानवी मूल्ये आहेत.मूल्य ही नैतिक संकल्पना आहे.मुख्यतः चांगले म्हणजे काय ? हा नैतिक मूल्याविषयीचा प्रश्न आहे.उदाहरणार्थ, मी चांगले का वागले पाहिजे ? इतरांनी माझ्याशी वाईट वर्तन केले तरी मी मात्र त्याच्याशी चांगलेच का व कसे वागावे ? खोटे बोलून फायदा होत असेल तर खरे बोलण्याचे कारण काय ? वाईट वागून फायदा होत असेल तर चांगले का वागायचे ? इत्यादी प्रश्न म्हणजे नैतिक मूल्यविषयक समस्या आहेत.त्या आपल्या थेट जगण्याशी संबंधित आहेत.त्या जगण्यापासून वेगळ्या नाहीत.अशा नैतिक प्रश्नांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे ' नीतिशास्त्र ' होय.

येथे हे लक्षात घेतले पाहिजे की नीतिमत्ता हा केवळ माणसात आढळणारा गुणविशेष आहे.नीतिच्या आधारेच माणसाने समाज निर्मिती केली. साहित्य, संगीत, विविध कला, विज्ञान, धर्म, नाट्य अशा गोष्टींनी सजलेली नटलेली, संस्कृती केवळ नैतिक जाणिवेमुळेच माणूस निर्माण करु शकतो. पण अशा भव्य दिव्य कृतीत युध्दाची , सत्तेची लालसा , विविध प्रकारची हिंसा ही दुरिते सुध्दा आहेत.माणूस थोड्याश्या लाभासाठी दुर्वर्तनास तयार होतो म्हणूनच चांगल्या वाईटाचा प्रश्न निर्माण होतो.

नीति हा शब्द 'नी' या संस्कृत धातूपासून बनतो.' नी ' म्हणजे नेणे , घेऊन जाणे अथवा वाहून नेणे .जी आपणास आयुष्याच्या मार्गावरून नेते , नेईल ती नीति.म्हणजेच ' जी आपणास जीवन जगण्यास मार्गदर्शन करते, चांगल्या जीवनाकडे घेऊन जाते. ती नीती होय.

इंग्रजीत नीतिला Ethics असा शब्द आहे.'नीतिशास्त्र ' हे Ethics चे भाषांतर होय. Ethics हा शब्द प्राचीन ग्रीक भाषेतील Ethos या शब्दापासून बनतो. Ethos म्हणजे सामाजिक चालीरिती, सामाजिक सर्वमान्य वर्तन. सर्वमान्य म्हणून चांगले, असे समीकरण त्या काळात असल्यामुळे Ethics म्हणजे चांगल्या वर्तनाचे शास्त्र अशी व्याख्या बनली.

Ethics ला Moral Philosophy असेही नाव आहे. प्राचीन लॅटिन भाषेतील moras या शब्दापासून morality हा शब्द बनलो. moral म्हणजे लोकांची समाजातील समान वागण्याची पध्दती .त्यामुळे सर्व माणसाच्या समान वागण्याच्या नीतिनियमांना Ethics असे म्हणतात.नैतिक वागणे म्हणजे चांगले वागणे,त्याचे शास्त्र ते नीतिशास्त्र होय. चांगुलपणा ही कल्पना आहे.म्हणून नीतिशास्त्र 'चांगले ' (Good ) या कल्पनेची चर्चा करते.त्याचप्रमाणे ते नैतिक वर्तनाच्या अटी कोणत्या ते सांगते.कसे वागले म्हणजे नैतिक वागल्यासारखे होते, त्याचीही माहिती देते.म्हणून नीतिशास्त्र शुभ जीवनाच्या स्वरूपाची व शुभ जीवनाच्या अटींची चर्चा करणारे शास्त्र होय.

चांगले म्हणजे काय ? हे कळत असूनही आपण वाईट का वागतो ? हा खूप मोठा नीतिशास्त्रीय प्रश्न आहे. उदा.कुटुंबातल्या सुनेला,कुलवधूला,स्वतःच्या भावजयीला भरलोकांमध्ये निर्वस्त्र करावे का ? हा द्रौपदीचा प्रश्न आणि आजच्या भ्रष्टाचाराचा प्रश्न नैतिकच आहे.अशा प्रश्नांची उत्तरे मिळतातच,असे नाही पण त्याची चर्चा करणे मात्र आवश्यक असते. त्यातून काही किमान मार्गदर्शन मिळू शकते .

पर्यावरणाचे आणि शेतीचे नीतिशास्त्र आपणास पर्यावरणाशी आणि शेतीशी चांगले का आणि कसे वागावयाचे ते सांगते.पर्यावरणाचे प्रश्न आज अतिशय गंभीर आणि धोकादायक झाले आहेत.म्हणूनच या दोन्ही नीतिशास्त्रांना आजच्या कालात अतिशय महत्व आले आहे.त्याचेच स्वरूप आपण पाहणार आहोत.